## प्रकरण - दुसरे

# मिथक : स्वरूप आणि संकल्पना

* प्रस्तावना:
* मिथक म्हणजे काय?
* मिथक : व्याख्या
* मिथकाचे स्वरूप
* भारतीय मिथकाची परंपरा
* मिथक आणि प्रतिके
* मिथक आणि इतर साहित्यशास्त्र
    १) मिथक आणि मानववंशशास्त्र / मानसशास्त्र
    २) मिथक आणि धर्म
    ३) मिथक आणि ललित कला
* मिथक आणि भाषा
* मिथक आणि साहित्य : परस्परसंबंध
* मिथक आणि मराठी साहित्य
    १) मिथक आणि काव्य
    २) मिथक आणि नाटक
    ३) मिथक आणि कथा / कादंबरी
* मिथक आणि 'पर्व'
* समारोप
* संदर्भसूची

**प्रस्तावना**

मिथक आणि साहित्य यांचा संबंध प्राचीन काळापासून आहे. मिथक ही संकल्पना निसर्गातील अगम्य अनुभवाची कल्पनामय निर्मिती आहे.आदिम काळापासून ते मानवाच्या भावनांना आपलेसे करून घेत आहे. सृष्टीची निर्मिती, मानवाची निर्मिती यांच्याविषयी प्राचीन मानवाकडून परंपरागत चालत आलेले ज्ञान पुढच्या पिढीकडे जाताना ते एक विश्वसनीय मिथक होऊन आपल्यासमोर येते. मिथकांचे प्राबल्य असलेल्या कथा या प्राचीन असूनसुद्धा नवा अर्थ प्रकट करण्यासाठी प्रभावी ठरल्या आहेत. साहित्यामध्ये येणारे मिथक प्रतिकात्मक अर्थ प्रकट करते.

भारतीय साहित्यामध्ये निसर्ग उत्पत्तीच्या संदर्भात मिथककथा निर्माण झाल्या आहेत. मिथकांचा उगम भारतामध्ये प्राचीन काळापासून मानला जातो. म्हणजेच भाषेच्या उत्पत्ती या मिथक घेऊनच निर्माण झाल्या आहेत. जेव्हा भाषा अस्तित्वातच नव्हती तेव्हा, मौखिक पद्धतीच्या आधारे मिथक निर्माण झाले असावे, व तद्नंतर भाषा अस्तित्वात आल्यावर मिथक साहित्याच्या रूपात प्रकट झाले असावे. साहित्यामध्ये येणारे मिथक परंपरेशी जोडलेली नवीनता यामधून व्यक्त होत असते. साहित्याची निर्मिती होताना मिथकाची परंपरा सोडून लिहिले जात नाही. प्रत्येक कलाकृतीमध्ये प्राचीन काळापासून ते आजवर मिथक आपले स्थान निश्चित करताना दिसून येते.

भारतीय साहित्यामध्ये मिथकांचे अस्तित्व स्पष्ट रूपाने समोर येते. रामायण, महाभारतासारखी महाकाव्ये, प्राचीन पुराणकथा, प्राचीन संस्कृत साहित्य, बौद्ध साहित्य, जैन साहित्य या सर्वांवर मिथकांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर जाणवतो. आधुनिक विचार आणि चिंतनामुळे एकूणच साहित्याला नवी दिशा मिळाली आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासामुळे पारंप रिक कल्पनांचे, विचारांचे वर्चस्व कमी होत असतानाही जगभरातील सर्वोत्तम कलाकृतींवर मिथकांचे अधिराज्य पसरलेले दिसते. फ्राईड, नॉर्थ्रोप फ्राय यांनी मिथकांची अनिवार्यता स्पष्ट के ली आहे. रिचर्ड चेज यांच्या सारख्या विचारवंतांनी मिथकाला 'उत्कृष्ट कविता ही मिथिकलच असते' असे म्हटले आहे.

यामुळे मिथक हे साहित्याचे एक अपरिहार्य रूप ठरले आहे. मानसशास्त्र, मनोविज्ञान यांच्या अभ्यासामुळे मिथकाचे स्वरूप स्पष्ट झाले आहे. मिथक या संकल्पनेचा शोध अनेक पातळीवर होत असलेला दिसून येतो. मानवी अनुभवविश्व विस्तारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मिथकाने केले आहे.

१९२० नंतर साहित्यामध्ये मिथकांचा वापर बऱ्याच प्रमाणात झालेला आढळतो. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये, भारतीय भाषांमध्ये मिथकांना एक नवा अर्थ निर्माण झाला आहे. सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांचा होणारा ऱ्हास याचा परिणाम म्हणून साहित्यामध्ये मिथके अवतरली असे म्हणावे लागेल. कविता, कादंबरी, नाटक, पुराणकथा यांच्यावर मिथकांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. म्हणूनच मिथक म्हणजे काय हे जाणून घेणे आवश्यक असल्याने प्रस्तुत प्रकरणाची योजना केली आहे.

**मिथक म्हणजे काय?**

मिथक ही संकल्पना Myth या इंग्रजी शब्दासाठी वापरली जाते. आपल्याकडे 'पुराणकथा' ही संज्ञा त्याच्या संदर्भात वापरली जाते. शिवाय 'प्राक्कथा', 'मिथ्यकथा', 'दैवकथा' आणि 'दिव्यकथा' या संज्ञा रूढ झाल्या आहेत. Myth हा शब्द ग्रीक 'माइथॉस' पासून निर्माण झालेला आहे. 'मिथ' याचा अर्थ आप्तवचन, शब्दकथा, कहाणी, अतर्क्य कथन असा होतो. हजारी प्रसाद द्विवेदी यांनी मिथक हा शब्द हिंदीमध्ये रूढ केला. तो मराठीमध्ये ही काहीशा प्रमाणात 'मिथक' म्हणूनच रूढ झाला आहे. हिंदी साहित्यिक नगेन्द्र लिहितात ''संस्कृत में इसके निकटवर्ती दो शब्द है। १: 'मिथस' या 'मिथ' जिसका अर्थ है परस्पर और २: मिथ्या जो असत्य का वाचक है। परंतु, वास्तव में 'मिथ' के पर्याय रूप में मिथक शब्द के निर्माण में अर्थ - साम्य की अपेक्षा ध्वनी - साम्य की प्रेरणा अधिक रही है - अर्थात समानार्थक की अपेक्षा यह समान, ध्वन्यात्मक शब्द ही अधिक है।'' [१] म्हणजेच मिथकांचा संबंध मिथसूशी लावला तर त्याचा अर्थ 'कल्पितकथा' असा होऊ शकतो.

विश्वनाथ खैरे लिहितात, "इंग्रजी साहित्य चर्चेत Myth या शब्दाचा वापर १८ व्या शतकात ज्या प्रकारच्या कथांसाठी होऊ लागला त्या कथा ग्रीक साहित्यात होमरच्या महाकाव्यात आधीच देव-देवतांच्या हकिकती सांगितलेल्या असत. अनेक अद्‌भुत आणि सहज विश्वास न बसण्याजोग्या गोष्टी असल्याने 'मिथ्य' शब्दाला 'अविश्वसनीय गोष्टी', 'भूलथापा' असाही अर्थ चिकटला आहे."[२]

सामान्यत: मिथक म्हणजे अशी काही परंपरागत कथा की जिचा संबंध अतिप्राचीन घटकांशी असतो. 'द्रविड महाराष्ट्र' (विश्वनाथ खैरे) या पुस्तकात मराठी स्थळनामाविषयीच्या कथांचे मिथ्यकथा, तथ्यकथा, सत्यकथा अशा तीन पायऱ्यावरून मूल्यांकन केले आहे.

आणि त्याचे प्रमाणतत्त्व किंवा मूलाधार मिथ्य, तथ्य, सत्य असा सांगितला जातो. दि. के. बेडकर यांनी मिथकाला 'दिव्यकथा' असे संबोधले तर विश्वनाथ खैरे यांनी 'मिथ्य' अशीच संज्ञा वापरली आहे. मिथक ही संकल्पना स्पष्टपणे कशा स्वरूपाची आहे हे आपणाला पुढील व्याख्यांच्या आधारे पाहता येईल.

## मिथक व्याख्या

मिथक या संकल्पनेच्या संदर्भात अनेक अभ्यासकांनी काही मते मांडली आहेत. त्यातील काही व्याख्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

राजीव नाईक यांनी 'नाटकातलं मिथक' या पुस्तकात रॅडम हाऊस एन्सायक्लोपिडीया मधील व्याख्या दिली आहे. ती पुढीलप्रमाणे,

"मिथक ही पारंपरिक दंतकथात्मक गोष्ट असते. जी सर्वसाधारणपणे देवादिक आणि अर्धदेव आणि जगाची उत्पत्ती आणि तिचे रहिवासी ह्यांच्या संदर्भात असते. दृष्टांतकथा, रूपक किंवा एखाद्या मूलभूत सत्याचा आविष्कार वा स्पष्टीकरण करण्याचा किंवा अर्थ लावण्याचा प्रयत्न करणारी ती एक गोष्ट वा श्रद्धा असते. अशी श्रद्धा किंवा श्रद्धाविषयक की जिचा खरेपणा शंकेशिवाय स्वीकारला जातो." [३]

विजया राजाध्यक्ष यांनी संपादित केलेल्या 'मराठी वाङ्मयकोश खंड चौथा'

मध्ये मिथकाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे.

"मिथक म्हणजे ऐतिहासिक घटितांचे कथन करणारी गोष्ट होय." [४]

'मिथक उद्भव और विकास तथा हिंदी साहित्य ' या पुस्तकात उषापुरी विद्यावाचस्पती यांनी हजारी प्रसाद द्विवेदी यांची व्याख्या उद्धृत केलेली आहे,

"रूपगत सुंदरता को माधुर्य और लावण्य कहना बिलकूल झुठ है, क्योंकी रूप न तो मीठा होता है न नमकीन लेकिन फिरभी कहना पडता है, क्योंकि अंतर्जगत के भावो को बहिर्जगत की भाषा में व्यक्त करने का यही एक मात्र उपाय है। सच पुछिये तो यही मिथक तत्त्व है। मिथक तत्त्व वास्तव में भाषा का पुरक है। सारी भाषा इसके बलपर खडी है। आदि मानव के चित्र में संचित अनेक अनुभूतीया मिथक के रूप में प्रकट होने के लिए व्याकूल रहती है। मिथक वस्तुत: उस सामूहिक मानव की भावनिर्मात्री शक्ती की अभिव्यक्ती है, जिसे कुछ मनोविज्ञानी आर्कि टाइपल इमेज कहकर संतोष कर लेते है।" [५]

हिंदी साहित्यिक नगेंन्द्र यांच्या 'मिथक और साहित्य' या पुस्तकात अर्न्स्ट कैसिरेर यांची व्याख्या अनुवादित स्वरूपात पुढीलप्रमाणे येते.

"मिथक का सत्य सर्वथा आत्मपरक एवं मनोवैज्ञानिक (मानसिक) सत्य होता है। और वह जागतिक वास्तविकता को मानवीय भावनाओं की शब्दावली में व्यक्त करता है, यह तर्कणाशक्ती के आविर्भाव के पूर्ववर्ती मानव - अनुभवों का अभिलेख है।" [६]

"मिथक ही सूचित केलेली वर्णने असतात. ती अधिकार वाणीने मांडलेली असतात. सर्वसामान्य मानवी जगापलीकडे जाऊन ती घटना आणि स्थितीबद्दल बोलतात. ज्या काळात वर्णन केलेल्या घटना घडतात तो काळ मानवी अनुभवातील सर्वसाधारण ऐतिहासिक काळापेक्षा वेगळा असतो. (तो बहुतेक वेळा कल्पना करवणार नाही इतका पुरातनही असतो) कथानकातील पात्र ही बहुधा देव किंवा अतिसाधारण जीव असतात. (उदा. प्राणी, वनस्पती अगदी सुरवातीचे मानव किंवा मानवी स्थिती बदलणारे थोर पुरुष) मानवी अस्तित्वात युद्ध आणि शांती, जीवन आणि मृत्यू, सत्य

आणि असत्य, शिव आणि अशिव ह्यासारख्या ज्या कळीच्या समस्या निर्माण होतात त्या समजून घेण्याकरिता लागणाऱ्या ज्ञानाचे मिथक जग हे कायमचे स्त्रोत्र ठरते."[७]

शिवाय नाईक यांच्या 'नाटकातलं मिथक' पुस्तकामध्ये मॅलिनोवस्की यांच्या व्याख्याचा उल्लेख आलेला आहे,

"मिथक म्हणजे जणू रिवाज संस्था आणि श्रद्धा ह्यांचे आश्रय स्थान आहे."[८]

त्याचबरोबर 'नाटकातलं मिथक' या पुस्तकात करशिआ एलिआड यांची व्याख्या दिलेली आहे,

"कुठल्या ना कुठल्या अर्थाने 'सर्जनशील काळ' पुनर्प्रस्थापित करणे किंवा जागृत करणे म्हणजे मिथक 'किंवा मिथकाचे कार्य' होय."[९]

म्हणजेच मिथक ही मानवी अस्तित्वातील मूलभूत आणि चिरंतन विरोधाभास गूढ अनुभूती ह्याच्या बद्दल असतात. असे वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते. विश्वाशी असलेल मानवाचे नाते, स्त्री - पुरूष संबंध यांच्या मधून मिथकांचे विषय दिसून येतात. कलावकाशातीत अशा आदिबंधात्मक व्यक्तिरेखांच्या आणि प्रसगांच्या सहाय्याने मिथक स्पष्ट होते.

**मिथकाचे स्वरूप**

मिथक हे कल्पना आणि सत्य या दोहोंच्या मिश्रणातून सिद्ध होते. मिथकांच्या निर्मितीचा काळ ऋग्वेदापासून मानला जातो. वेदांपासून ते रामायण, महाभारत या सारख्या साहित्यामध्ये मिथकांचे अस्तित्व जाणवते. वैदिक कालखंडामध्ये मिथक नैसर्गिक आणि दिव्य रूपात निर्माण झाले आहे. मिथक हे त्या कालखंडामध्ये ईश्वरी शक्तीचे प्रतीक म्हणून ओळखले जात होते. मिथक ही संज्ञा किंवा संकल्पना दुर्लक्ष गोष्ट नसून, विश्वाचा शोध घेणारी, मानवी जिज्ञासा, कोरडा बुद्धिवाद आणि ओला भाववाद या दोहोंच्याही वर जाऊन काम करते. भावलेल्या तथ्यामागचे सत्य शोधण्याकरिता वापरलेली एक पायरी हे मिथ्याचे स्वरूप असते.

नगेंद्र यांनी मिथकांचे स्वरूप कथात्मक आहे असे सांगितले आहे. तसेच

कथेतील घटना लोकबाह्य, अलौकिक किंवा अतिमानवीय असतात. साहित्यामध्ये मिथकाचे स्वरूप काल्पनिकतेचे असलेले स्पष्ट झालेले आहे. वस्तुत: कल्पना आणि सत्य हे मिथक कल्पनेचे स्वरूप असलेले दिसते. दुर्गा भागवत मिथक कथांचा हेतू स्पष्ट करताना म्हणतात, ''आपल्या आयुष्यातला अर्थ शोधणे, आयुष्य निरर्थक आहे नियतीपुढे आपले काहीही चालत नाही या विचाराने माणसाला निराशा येते. याच निराशेने माणूस ग्रासून गेलेला असतो. पुढे कधीतरी या भावनेला शब्द मिळतात घटनेची चौकट मिळते आणि मिथ्यकथा निर्माण होते.'' [१०]

आजवर मिथकांचा शोध वेगवेगळ्या पातळीवर घेतलेला आहे. निरनिराळ्या देशात निरनिराळी मिथके प्रचलित आहेत. त्याचा प्रभाव समाजजीवनावर पडत असतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ग्रीक देशातील मिथके म्हणता येतील. मिथकांचे स्वरूप स्पष्ट करताना अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत.

मिथकांच्या आदिम अभिव्यक्तीस भाषाशास्त्राच्या दृष्टिने मॅक्समूलरने भाषेची विकृती मानले आहे. 'मिथ' अशुद्ध व विकृत व्युत्पत्तीतून जन्मास आल्यामुळे भाषेचे स्वाभाविक स्वरूप नष्ट होते. नंतरच्या काळात फ्राईड ने मानसशास्त्राच्या आधारे मिथला मानसिक विकृती मानले. फ्राईडने मिथ मधील अभिव्यक्तीस स्वप्न मानले. त्याच्या मते, ''सर्व स्वप्नांचा उदय मानसिक विकृतीतून होत असतो. परंतु कार्ल युंग या मानसशास्त्रज्ञाने मिथ बद्दल निरनिराळ्या सिद्धांताची मांडणी केली आहे. त्यास 'सामूहिक अचेतनाचा' (कलेक्टिव अन कॉन्टास) सिद्धांत असे म्हणतात. माणसाने जे पाहिले किंवा अनुभवले त्याची त्यांच्या मनावर एक प्रतिमा (इमेज) उमटली. युंगने या आद्य प्रतिमेस'आर्केटाइपल' असे म्हटले आहे. ती प्रतीमा माणसाच्या मनात खोलवर रूतली व त्यानंतर त्याने मिथक कथा रचली असावी असे युंगला वाटते.'' [११] म्हणजेच जीवनातील साध्यासुध्या घटनांना किंवा व्यक्तींना तात्विक रूपे देणारी मिथक ही अनिवार्य प्रतिमा ठरली आहे.

मिथक साहित्यामध्ये प्रतिबिंबीत होताना कलात्मक व प्रतिकात्मकतेचा आधार घेऊन येते. कल्पित अवस्था किंवा सत्य आधारित मिथक कथा लोकांच्या आवडीच्या

असतात, त्यांच्या मनाला भावलेल्या असतात. सुषमा दाते मिथकांचे स्वरूप स्पष्ट करताना लिहितात, ''मिथके ही तर्काधारे समजून घेता येत नाहीत. हे विश्व कसे निर्माण झाले? मृत्यूनंतर काय? अशा अनेक प्रश्नांना विज्ञानात ठोस उत्तरे नाहीत. अनादि काळापासून उत्तरे शोधताना माणसाने काल्पनिक कथा तयार केल्या. या कथांच्या लेखकांचे नाव माहित नसते. कथेत मांडलेल्या घटनांना साक्षी कुणी नसते. पण माणसांच्या मनातल्या खोलवर दडलेल्या भितीचे किंवा शंकेचे लहान मुलाशी तार्किक चर्चा न करता समाधान करावे तसे समाधान या कथा करत असतात. अतर्क्य घटनांना अतर्क्य अभिव्यक्ती असे मिथकांचे स्वरूप असते.''[१२]

मुळात मिथके ही सामूहिक जाणिवांची निर्मिती असते. मिथकांमधून मानवी विचारांचा, संस्कृतीचा इतिहास प्रतिबिंबित होत असतो. मिथक मनुष्याला जाळ्यामध्ये पकडून ठेवण्याचे काम करतात. स्वत:पेक्षा सामूहिकतेला महत्त्व देणारी, सामूहिक कल्याण, विचार सर्व समावेशक करणे. विवेकी होणे या तर्कापलीकडच्या भावनेला साद घालण्याचे कार्य मिथक करताना दिसतात. सार्वत्रिकता हे मिथकाचे वैशिष्ट्ये असलेले दिसून येते. मिथक ही एक सार्वभौम संकल्पना आहे. तिला देश, काल यांच्या मर्यादा नसतात, तर त्या मानवाच्या सामूहिक आणि निरंतर अनुभूतीचे शब्दरूप आहेत. त्यातून मानव आणि प्रकृती यांच्यातील निरंतर एकात्मतेचे दर्शन घडते.

वरील विवेचनावरून मिथकांच्या भूमिकेवर प्रकाश टाकलेला आहे. निसर्ग आणि माणूस, गूढ विश्वचक्र यातील अन्वयाविषयीची मनुष्यनिर्मित रचिते म्हणजे मिथक. कलाकृतीच्या रचनेतून योजलेल्या प्रतिकांमधून त्या त्या काळातील विश्वभान, अलौकिकाची संकल्पना, विश्वातील ऋतूची संकल्पना, अनिष्ठांची दृश्य - अदृश्य रूपे या सर्वांतून मिथक निर्माण होण्याच्या मार्गावर असते. मानवी पिढ्यांच्या दर्शनाचे तारतम्य मिथकांत व्यक्त होते. म्हणूनच मिथके ही प्रवाही राहतात असे मिथकांचे स्वरूप स्पष्ट होते.

## भारतीय मिथकाची परंपरा

भारतीय साहित्यामध्ये मिथकांची परंपरा प्राचीन असलेली दिसून येते. मिथक कथांची सुरुवात वेदांपासून झालेली आहे. विश्वनाथ खैरे यांच्या मते, ''वस्तुत : वेद हे ग्रथित साहित्य आहे आणि लोकसाहित्याप्रमाणे केवळ वाङ्मयरूपात ते रक्षित झाले असले तरी मिथ्यकथांची जन्मकुळी आदिम समाजाची असल्यामुळे, त्या वेदांच्याही पूर्वी उद्‌भवलेल्या आहेत. वेदांची भाषा ही वेदपूर्व लोकभाषांमधून विकसित झालेली आहे. त्या अर्थाने वेदांमध्ये त्या लोकभाषांतल्या मिथ्यकथांपेक्षा त्यांच्यावरून साधलेल्या पुराणकथा आहेत असे म्हटले पाहिजे.'' [१३] मिथ्यकथा या आदिम मिथ्याचा भाग असलेल्या दिसून येतात.

रामायण, महाभारत यासारख्या महाकाव्यांमधून अनेक कथा रूपांतरित झालेल्या दिसून येतात. त्यांना पुराण कथा म्हटले जाते, यालाच मिथस् म्हणून ओळखतात. मराठीमध्ये ज्ञानेश्वरांसारख्या संतांच्या नावावर मोडणाऱ्या चमत्काराच्या कथा हे याचे उत्तम उदाहरण आहे. श्रद्धेने खऱ्या मानलेल्या गोष्टींना मिथ् मानले जाते, तसेच श्रद्धेने विश्वास ठेवलेल्या समजूतीना किंवा विचारांना मिथके म्हटले जाते.

भारतीय चिंतनात मिथ्य म्हणजे सत्याचा आभास असतो. मिथ्य आणि मिथ्यकथा यांचे विवरण सुसंगत आहे असे वाटते. जिज्ञासू, बुद्धिवादी भूमिकेतून मिथ्यकथांचा शोध घेता येतो. यातूनच भारतीय मिथके कशी निर्माण झाली याची उमज येते. याच मिथक कथांची नाळ वर्तमान काळाशी जोडलेली पहावयास मिळते. भारतातील मिथकांची परंपरा समृद्ध असलेली दिसून येते. या संदर्भात पुष्पा भावे म्हणतात, ''मिथकांच्या आधारे निर्माण होणाऱ्या वाङ्मयकृतीचा विचार करताना कोणत्याही सामाजिक मन:स्थितीमध्ये कोणत्या मिथकांची निवड होते, त्या मिथकातील कोणत्या घटकांशी नव्याने अन्वय जोडला जातो हे महत्त्वाचे असते.'' [१४]

संस्कृतीच्या टप्प्यावर जिला धर्म कथेचे स्वरूप प्राप्त आहे त्यामधूनच मिथ् निर्माण होते. हे स्पष्ट करताना दुर्गा भागवत म्हणतात, '' अद्यकाळात मानवाच्या भोवती असलेल्या निसर्गाचे, निसर्गात होणाऱ्या बदलाचे एक गूढ मानवाला वाटत

होते. आपण पशुपक्षी, वृक्षवेली, धरती- आकाश, गृहतारे कसे अस्तित्वात आले? जन्म, वाढ व विनाश हे चक्र का फिरत असते? पाऊस व वादळे का येतात? असे अनेक प्रश्न सभोवतालच्या निसर्गाबद्दल त्याला पडलेले होते. निसर्गातील वस्तूंच्या या अस्तित्वाची व निसर्गातील घडामोडीची व्यवस्था लावण्याच्या प्रेरणेतून अद्य पुराणकथा जन्मल्या. नैसर्गिक वस्तू व घडामोडी यांच्याशी त्याने कल्पिताचे नाते जोडले व त्यातून पुराणकथा जन्मली या प्रकारे निसर्गदृश्यांची सुसंगती लावण्यासाठी मानवाने पुराणकथा निर्माण केल्या.''[१५] या विवेचनावरून भारतीय मिथकांची परंपरा स्पष्ट होते.

**मिथक आणि प्रतिके**

मिथक आणि प्रतिके यांचा संबंध दृढ स्वरूपाचा असलेला दिसतो. मिथकांचा साहित्यामध्ये वापर केला जातो. तेव्हा ते मिथक प्रतीक म्हणून साहित्यात येते. साहित्यामध्ये भाषेचा वापर करताना बऱ्याचदा अलंकाराचा वापर केला जातो. तेव्हा ती भाषा अधिक प्रभावशाली वाटते. म्हणूनच मिथकाने साहित्याला प्रतिकांचा आधार दिलेला आहे. विद्यावचस्पती यांनी, ''अधिकांश मिथक कथाए भावनात्मक प्रतिको की सुंदर योजना जान पडती है। वास्तव में मिथक साहित्य बहुविध प्रतिको की अनुपम निधी है।'' [१६] म्हणजेच मिथकांचा प्रतिकांच्या आधारे होणारा साहित्यात वापर स्पष्ट होतो.

मिथकांच्या आधारे सामूहिक कथा, घटना किंवा व्यक्तिरेखा या आपले प्रतिकात्मक रूप जपताना दिसतात. जेव्हा भाषा अभिधा शक्तीच्या माध्यमातून संप्रेषण करते तेव्हा ती मिथकांचा आधार घेते. आणि प्राचीन मानवाने जेव्हा सृष्टीचे रहस्य भाषेद्वारे प्रकट करण्यास सुरुवात केली. तेव्हा त्यांने प्रतिकांचा आधार घेतलेला पहावयास मिळतो. प्रतिकांच्या माध्यमातून मिथकांचे अंतरिक सत्य समजून घेता येते आणि ती कालखंडानुरूप नवीन निर्माण होत राहतात. उदा. रामायण, महाभारतातील व्यक्तिरेखा या कालखंडानुरूप बदलत गेल्या आहेत हे स्पष्ट होते.

मिथक आणि प्रतिके यांच्या संदर्भात वेगवेगळी मते मांडली जातात.

आपल्याकडील पुराणकथा आणि घटना कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील प्रतिकांचे चित्रण करतात. मार्क शोरर यांच्या मते, ‘जीनवातील साध्यासुध्या घटनांना किंवा व्यक्तिंना तात्विक रूपे देणारी मिथके ही एक अनिवार्य प्रतिमा आहे. तर रिचर्ड चेज यांनी मिथक म्हणजे केवळ भावना नाहीत. भावना प्रकट होताना प्रतिकरूप धारण करतात तेव्हा ती मिथक होतात असे मांडले आहे.

शैला लोहिया यांनी मिथक प्रतिमा स्पष्ट केली त्यांच्या मते, ‘‘मिथक ही एक सर्वस्पर्शी प्रतिमा आहे. जीवनातील तथ्य आणि मूल्यविचार यांना प्रकट करते. मिथक कलासंवादी असते काळ बदलतो त्यानुसार जीवनरीत बदलते परंतु मिथक कलासंवादी राहते. उदा. दुर्गेचे मिथक दुष्टत्वाचा संहार करून, समाजातील भय दूर करून, सुरक्षितता व शांती प्रस्तापित करणाऱ्या स्त्री ची शक्ती आहे. बांगला देश स्वातंत्र्य युद्धात भारताच्या पंतप्रधान कै. इंदिरा गांधीच्या संदर्भात दुर्गा हे मिथक वापरले जाते.’’ [१७]

सर्जनशीलतेच्या आदिबंधातून भारतीय परंपरेने भूमीला महामाता मानले, मातृत्वाचा अधिकार असणाऱ्या स्त्रीतील मातृत्व सर्वश्रेष्ठ मानले आहे. भारतातील प्रत्येक गावात दगडाची मूर्ती देवीची असते. तिची नावे स्थल -कालपरत्वे वेगळी असलेली दिसून येतात. ते तिच्यावर सर्जनशीलतेचे प्रतिकात्मक रूप असते. अशा मिथकांच्या आधारे प्रतिमा साहित्यात येताना दिसतात.

राजीव नाईक यांच्या मते मिथके साहित्यात येताना प्रतीक आणि रूपक या स्वरूपात येतात. हे स्पष्ट करताना त्यांनी दिलेले उदाहरण लक्षणीय ठरते. ‘‘किचक वध या नाटकामध्ये सैरंध्री हे पात्र भारत मातेचं सूचन करते तर किचक हे पात्र लॉर्ड कर्झनचं, कथानक आणि पात्र ब्रिटीश राजवटीवर भाष्य करण्यासाठी इथे वापरण्यात आली आहेत.’’ [१८]

साहित्यामध्ये येणारी मिथके ही प्रतिमांचा, प्रतिकांचा आधार घेऊन वावरताना दिसतात. हे या विवेचनावरून स्पष्ट होते.

**मिथक आणि इतर साहित्यशास्त्र**

मिथक आणि इतर साहित्यशास्त्र यांचा संबंध सनातन स्वरूपाचा असलेला

पहावयास मिळतो. इतर साहित्यशास्त्राच्या आधारे मिथकांचा वेगवेगळ्या अंगाने अभ्यास केला आहे . ते कशा प्रकारे याचा आढावा पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**१) मिथक आणि मानववंशशास्त्र / मानसशास्त्र**

साहित्यामध्ये मिथक आणि मानसशास्त्राचा संबंध आलेला आहे हे स्पष्ट होते. याचा विचार करताना सर्वप्रथम लेविस स्पेस यांनी मिथकांची उत्पत्ती आदिमानवाच्याद्वारे झाली आहे असे मांडले आहे. प्राचीन मानवाच्या निसर्गाविषयीच्या समस्या आणि त्या समस्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा स्वीकार हे प्राचीन मानवाचे खऱ्या अर्थाने विज्ञान मानले जाते.

अन्र्स्ट कॅसिरेर यांनी मिथकाला प्रत्यक्ष ज्ञानावर आधारित व्यवस्थित विचारप्रवृत्ती मानले आहे. ज्याचे खरे वास्तव्य निसर्गापेक्षा समाज मानले आहे. फ्राईडने मिथकांचा संबंध सहज प्रवृत्तीशी जोडला आहे. मिथके ही सहज प्रवृत्तीची अविष्कार माध्यमे असतात. त्यांच्या मते, ''मिथक म्हणजे मानवजातीची युगानयुगाची स्वप्ने संपूर्ण राष्ट्राच्या फॅंटसी विरूपित अवशेष होत हाच दृष्टिकोन स्वप्ने ही व्यक्तीची मिथके तर मिथके ही मानव जातीची निधर्मी स्वप्ने या उक्तीतून व्यक्त होते. या मिथकांचे वरवरचे अर्थ आणि त्यातून ध्वनित होणारे अर्थ स्वप्नाप्रमाणेच भिन्न असतात. त्यांची भाषा चित्रभाषेसारखी व्यंजक असते. त्यातून काही नि:गूढ सत्ये प्रकटत असतात.'' [११] म्हणजेच फ्राईडने मिथकांना नेणीवेतल्या घडामोडीची शिल्लक मानलं आहे आणि असेही सांगितले की मिथक लैंगिक प्रेरणांशी बांधलेली असतात.

युंग या मानववंशशास्त्रज्ञाने मिथक आणि मानवंशशास्त्र विषयी आपले प्रभावी मत मांडले आहे, ''मानवाच्या नेणीवेत अनूकॉनशस मनातून मूलभूत प्राथमिक अशा प्रतिमा प्रवास करतात. त्याने सामूहिक नेणीव ही संकल्पना मांडली ही सार्वत्रिक सर्व माणसात समान अशीच असेल ह्या सामूहिक जाणीवेत जे असतं त्याला 'आदिबंध' असे युंगने म्हटले आहे. आदिबंधात्मक प्रतिमा निर्माण होताना ज्या मिथक स्वप्न कला आणि साहित्यात आढळतात ह्यांना युंग काळाच्या अगदी प्रारंभापासून अस्तित्वात

असलेल्या सार्वत्रिक प्रतिमा असे संबोधतो." [२०] मिथकांमध्ये आणि साहित्यामध्ये आपणाला ज्या कल्पना आढळतात त्या केवळ आदिबंधात्मक प्रतिमा म्हणून ओळखल्या जातात. अशी निर्माण होणारी मिथके म्हणजे नेणीवेत घडणाऱ्या घटना बद्दलची उत्स्फूर्त विधाने होत.

मिथकाला व्यक्ती, समाज आणि परंपरा यांच्याशी संबंधित माणून त्याला सामूहिक जागृतीचा विषय मानले आहे. यावरून मिथकांचा संबंध मानसशास्त्राशी आणि मानववंशशास्त्राशी आलेला दिसून येतो हे स्पष्ट होते.

## २) धर्म आणि मिथक

मिथक हे निसर्ग घटितांचे स्पष्टीकरण देण्यासाठी निर्माण झाली असावित असे वाटते. इतिहास वा विज्ञान यांचा आधार नसलेली, निसर्ग घटना, ऐतिहासिक घटना देवदेवता इ. बाबतच्या लोककल्पना ग्रथित करणाऱ्या कथा म्हणजे मिथक म्हणता येईल. मिथके ऐतिहासिक व्यक्तीवर आधारलेल्या अख्यायिकेहून वेगळी किंवा अनैतिहासिक किंवा अतिमानवी प्राण्यांची त्यांच्या अस्तित्वाची कथा होय. अशा स्वरूपाची मिथके सर्व धर्मामध्ये आढळतात.

मिथक आणि धर्म याचे नाते रोचक स्वरूपाचे आहे. धर्म हा मिथकांचा एक स्तोत्र आहे. कारण विश्वाची निर्मिती, निसर्गविषयीच्या भिती व आनंद यांच्या रहस्यांनी मिथकांना जन्म दिला आहे. यातूनच भीतीचे निवारण आणि आनंद प्राप्तीच्या मनोवृत्तीतून अनेक दैवीशक्तीची कल्पना येते, यामधूनच धर्माची निर्मिती झाली असावी. मिथक हे अनुष्ठानाचे क्रियात्मक रूप आहे. आणि अनुष्ठान धर्माचे मूलभूत अंग आहे. त्यामुळे मिथकांचा धर्माच्या क्षेत्रामध्ये प्रयोग होतो. अमूर्तीकरणातून दैवीय शक्तीचा उदय हा मिथकांची दैवीय विषमता आहे. आणि दैवी शक्तीचा अभाव हे धर्माचे अविष्कार आहेत. तर सर्वशक्तिमान सत्तेचा स्वीकार हे धर्माचे अस्तित्व आहे. उदा. मिथकीय परंपरेचे प्रतीक असलेली जातककथा या जातककथा बौद्ध धर्माच्या अभिन्न अंग आहेत. वेद, उपनिषद पुराण हे हिंदू धर्माचे आधारस्तंभ आहेत. धार्मिक प्रतिकांचे उगमस्थान

मिथक मानले जाते.

या सर्व विवेचनावरून मिथक आणि धर्म यांचा संबंध अनन्यसाधारण स्वरूपाचा आहे. हे स्पष्ट होते.

### ३) मिथक आणि ललित कला

ललित कलांमध्ये मिथकांचे प्राबल्य आढळून आले आहे. संगीत, मूर्तीकला, चित्रकला यामध्ये मिथकांचा वापर केलेला आहे. ललित कलेत संगीताला सर्वोच्च स्थान असलेले दिसते. प्रत्येक देशामध्ये संगीताचे प्राथमिक रूप धार्मिकतेशी जोडलेले आहे. संगीताची उत्पत्ती वेगवेगळ्या देशात विविध पद्धतीने मांडली आहे. पांडित्यपूर्ण शास्त्राच्या रचनेनुसार मिथक साहित्यामध्ये संगीताच्या उत्पत्तीविषयी काल्पनिक कथा प्रचलित असलेल्या दिसून येतात.

वेगवेगळ्या देशांचे मिथक साहित्य वेळेच्या सीमेमध्ये बांधता येत नाही, तर ते इतिहासानुसार पुढे सरकत असते. मिथकांच्या पार्श्वभूमीतूनच विविध कलांचा विकास झाला आहे. आणि यामधूनच मूर्तिकला, चित्रकला यासारख्या कलांचा उदय झालेला आहे.

मिथक आधारित कथा या धार्मिकतेच्या रहस्यांमध्ये अडकलेल्या दिसतात. धर्माचे प्रतीक, पवित्र, शुभ संकट निवारक समजले जाते. दैदिप्यमान, दिव्य, अलौकिक शक्ती यांच्या द्युतीमान रूपामध्ये मानवाच्या भावनांचे मूर्तीकरण करून देऊळ किंवा मंदिरात ते स्थापन झाले आहे. अशा प्रकारे मिथकांचे मूर्तिकलेमध्ये रूपांतर झाले. अजंठा, वेरूळची लेणी हे याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल.

म्हणजेच मिथकाचे क्षेत्र हे कला निर्माण करणाऱ्या मानसिकतेशी निगडित असलेले स्पष्ट होते. मानवी संकल्पना शक्तीचा सौंदर्यात्मक अविष्कार म्हणून मिथकांकडे पाहिले जाते.

## मिथक आणि भाषा

मिथक ही संकल्पना भाषेला अगदी जवळची आहे. भाषा ही मिथकांच्या तत्त्वांवर अवलंबून आहे. आदिमानवाच्या मनामधील अनेक अनुभव प्रकट होताना ते मिथकांच्या स्वरूपात प्रकट झालेले आहे असे दिसते. तेव्हा ते अनुभव एकांगी, तर्कहिन व मिथ्य आहे असे वाटते. परंतु सूक्ष्मपणे पाहिले तर ते मनुष्याच्या अंतर्गत अभिव्यक्तीचे भाषा हे एकमात्र साधन आहे. मिथक वस्तुत: मानवाच्या सामूहिक भावनानिर्मित शक्तीचे प्रकटीकरण करते. ज्याला काही मानसशास्त्रज्ञ आर्केटाइपल बिंब म्हणून ओळखतात. अर्न्स्ट कैसीरेर यांच्या मते, ''मिथक ही भाषेबरोबरच विकसित होत गेलेली स्वतंत्र स्वरूपाची प्रतिकप्रणाली आहे. भाषा हा मिथकाचा अविभाज्य घटक नाही पण ती भाषारूप होऊन आली की त्याचा संबंध साहित्याशी येतो.'' [२१]

साहित्यामध्ये कवी भाषेचा सर्जनात्मक उपयोग करत असतो. भाषेच्या सर्जनात्मक प्रयोगाची प्रक्रिया मिथकरचनेची प्रक्रिया असते. मिथक आणि भाषा या मानव संस्कृतीच्या आरंभी प्रतीक प्रणालीत स्पष्ट होते. ''प्राक्कथांचा भाषेशी आणि संस्कृतशी जवळचा संबंध असतो. प्रत्येक संस्कृतीत प्राक्कथा आढळतात आणि प्राक्कथा भाषेतून व्यक्त होतात.''[२२]

म्हणजेच मिथक हे भाषा, कला, विज्ञान यासारख्या प्रतिकात्मक वास्तवाच्या आकलनाची माध्यमे आहेत. या सर्वांमधून मिथकाचे संदिग्ध रूप व्यक्त होते. मिथक हे प्रकट होताना भाषेमध्ये प्रतिमा आणि प्रतिके यांच्या माध्यमातून प्रकट होत असते. यावरून मिथक आणि भाषा यांचा निकटचा संबंध असलेला पहावयास मिळतो.

## मिथक आणि साहित्य परस्पर संबंध

तात्त्विकदृष्ट्या मिथक आणि साहित्यात समानता स्पष्ट झालेली आहे. मात्र साहित्याचा जेवढा अभ्यास झालेला आहे तितका मिथकांचा झालेला नाही. पण साहित्याचा विचार करताना मिथकांना वगळून चालत नाही. मिथकांचा संबंध मानवाच्या बाह्यजगताशी आहे. तसा त्याच्या अंतर जगताशीही असलेला दिसून येतो. मिथक

आणि साहित्य यांचा असलेला अतुट संबंध उलगडून दाखविताना नार्थ्रप फ्राय यांनी मिथक अलौकिक कथात्मक रचना असेल तर साहित्य लौकिक कथात्मक रचना आहे असे सांगितले आहे.

फ्राय यांनी मिथक आणि साहित्य यांचा परस्पर संबंध स्पष्ट करताना सिद्धांत मांडलेला आहे. तो म्हणजे, ''रोमान्स म्हणजे अद्‌भुतरम्य कथा ही मिथकाची विस्थापन डिस्प्लेसमेन्ट असते तर कादंबरी अद्‌भुतरम्य कथेचे विस्थापन असते.'' [२३] हाच मध्यवर्ती सिद्धांत आहे. मिथकांच्या माध्यमातून साहित्याच्या आधारे वैयक्तिक जीवनदर्शन व्यक्त होते. मिथक आणि साहित्य यांची उगमस्थाने एकच असलेली दिसतात. साहित्यातून मिथकाला वेगळे करून लिहिता येत नाही. कारण मानवी मनावर मिथकांचा प्रभाव आणि मानवाच्या चेतनेचे प्रकटीकरण हे साहित्यात उमटलेले असते. मिथकाने पहिल्यापासूनच साहित्याला प्रभावी केले आहे. साहित्यामध्ये मिथकांच्या आधारे भावना, कल्पना, आकांक्षा इ. मानसिक वृत्तीचे प्रकटन होते हे स्पष्ट होते.

प्राचीन कालखंडापासून मिथक साहित्य विषयवस्तूच्या रूपाने बदलत आहे. ज्याचे प्रारंभिक रूप कवीकडून, मौखिक परंपरेतील कथांच्या अधारे साहित्यात आले आहे. साहित्याच्या दृष्टिकोनातून मिथकांचे रूप, प्रतिबिंब, पुराण, प्रतीक यांच्याशी जोडले आहे. मिथक साहित्यामध्ये आल्याने अधिक प्रभावकारी बनले आहे. मिथकांच्या आधारे साहित्यिक आपली कलाकृती सहज प्रभावी, अर्थपूर्ण किंवा कलाजीवी बनवत असतो.

साहित्यामध्ये ''मूळ मिथकाचे विरूपन करून त्यांच्याद्वारे वर्तमान वास्तवाचे किंवा मानवी सहज प्रेरणांचे दर्शन घडविणे, मानवी तृष्णा आणि वास्तव यांचे सामंजस्य साधणे, माणसांना आपल्या परंपरेशी जोडून तिच्या एकसंधतेचा अनुभव आणून देणे इ. गोष्टीसाठी मिथकांचा वापर केला जातो.'' [२४]

म्हणजेच मिथकांचा साहित्यावरील प्रभाव प्राचीन काळापासून ते आजपर्यंत असलेला दिसतो. मिथकांची मानवी चेतना आणि मानवी मूल्य प्रभावित करण्याची क्षमता भविष्यामध्ये टिकवण्याचे कार्य साहित्यावर अवलंबून आहे.

**मिथक आणि मराठी साहित्य**

वेगवेगळ्या काळात मराठी साहित्यामध्ये मिथकांचे अस्तित्व स्पष्ट झाले आहे. रामायण, महाभारत, पौराणिक काव्य - कथा यावर आधारलेल्या साहित्याची निर्मिती सातत्याने झालेली दिसते. मध्ययुगीन मराठी साहित्यात सामान्य वाचकांच्या दृष्टिने सुलभ रंजक पण बोधप्रद वाटणाऱ्या मिथकीय व पौराणिक कथा रचना, कथाभागावर विशेष भर देऊन मराठीत आणल्या आहेत. मिथकांचा वापर साहित्यात कधी उपमा - दृष्टांतानी केला गेला आहे तर कधी ही मिथके रूपक कथांच्या स्वरूपात आलेली आहेत. मराठी साहित्यात वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारात आलेली जाणवतात त्याचा आढावा आपण पुढीलप्रमाणे घेणार आहोत.

**१) मिथक आणि काव्य**

मिथक आणि काव्य यांचा परस्पर संबंध अगदी जवळचा आहे. प्राचीन काव्यामधूनही मिथक स्पष्ट होताना दिसते. रामायण, महाभारत या महाकाव्यांमध्ये मिथकांचे असलेले प्राबल्य यावरून काव्यामध्ये असणारे मिथकांचे स्थान आपल्याला दिसून येते. महाकाव्यामध्ये एकाचवेळी अनेक विचारप्रणाली, जीवनसृष्टी जाणवते, त्यामधून एका वेळी अनेक अर्थ प्रकट होतात. या संदर्भात राजीव नाईक म्हणतात, ''महाकाव्य हे तडक, खुलं, सरळसोट, उघड वाघड, कथनात्मक, स्पष्टीकरणात्मक, वर्णनात्मक, गद्यात्मक असतं म्हणूनच महाकाव्यात ऐहिकतेचं दर्शन घडतं'' [२५]

मिथक हे उच्च काव्य प्रतिभेचे अंग आहे असे ना. वा. देशपांडे म्हणतात. मिथकाचे काव्यातील कार्य सिमीत करणारे आहे. कवितेत येणारी मिथकं ही केंद्रीय असतात. मिथकांचे ''समकालीन घटितांचे आकलन करताना त्यातील कालातीतता व्यक्त करण्यासाठी कवी आपल्या कवितांमधून मिथकांचा उपयोग करताना दिसतात.'' [२६] मिथकांचा एक पैलू म्हणजे कथन करणे हा आहे. कुणा कवीने जाणिवेच्या पातळीवर केलेले नसते, तर मानवाच्या अबोध मनातील घटकांना दिलेले ते कथनरूप असते.

आधुनिक कवितेला साजेल अशाच तऱ्हेने कल्पित कथांचा उपयोग केला

15411

जातो. कवितेमध्ये कल युगाचे मिथक स्वीकारून त्यामध्ये काही फेरफार करून मिथकाला नवा अन्वयार्थ दिला जातो. कवी कविता निर्माण करताना परंपरागत पौराणिक कथांचा उपयोग करतात. पण प्रतिभा संपन्न कवी स्वतःच्या कल्पित कथाही नव्याने निर्माण करतात. अशा कविता अख्यानपर बनलेल्या आहेत. "प्राक्कथांचे कवितेशी असलेले नाते म्हणजेच त्यातले रूपक तत्त्व प्राक्कथांचा वेगवेगळ्या स्तरांवर अर्थ लावता येतो. मानवी आत्म्याची बुद्धीने न उलगडता येणारी रहस्य उलगडण्याचे प्रक्कथा हे एक साधन आहे." [२७] अशा कथांचे समाजाकडे विशाल भांडार असते, यातूनच कथासूत्र निर्माण होऊन महाकाव्य रचलेली आहेत हे स्पष्ट होते.

वेद, पुराणे महाभारतासारख्या प्राचीन वाङ्मयातून आलेल्या प्राक्कथांमधून आधुनिक कवींनी प्रतिमारूपे घेतलेली आहेत. तसेच पाश्चात्य कथातूनही काही प्रतिमारूपे घेतलेली आहेत. उदा. केशवसुत, पु. शी.रेगे, बा. सी. मर्ढेकर, वि. दा. करंदीकर, सदानंत रेगे, दिलीप चित्रे, वसंत आबाजी डहाके इ. कविच्या कवितातून अशी प्रतिमा रूपे आढळतात." [२८] आदि मानवाचे सृष्टी विषयक अनुभव अबोध स्तरावर प्रतिमांचे प्रकटीकरण करत असते.

सुधीर रसाळ यांच्या मते, "काव्य मिथके ही कवीच्या संवेदनशीलतेला, जगाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाला किंवा त्यांच्या जाणीवांना पायाभूत चौकटीला प्रकाशित करतात. ती कवीच्या काव्यविश्वाच्या कक्षेत अर्थपूर्ण असतात. लोकमिथके अशी व्यक्तिगत निर्मिती नसते, ती मानव समूहाच्या धार्मिक, सांस्कृतिक श्रद्धांतून जन्मलेली असतात. विश्वाकडे, मानवी जीवनाकडे पाहण्याचा मानवसमूहाचा दृष्टिकोन, माणूसकीची संवेदनशीलता त्यातून प्रकट होते." [२९] कवितेत येणारी मिथके ही एकमेकांना परस्पर पुरक असू शकतात किंवा ती विरोधीही असू शकतात. कवितेमध्ये येणाऱ्या मिथकांचा पट व्यापक असलेला आढळून येतो.

कवितेतील काही शब्द प्रतिमारूप, काही प्रतिकरूप असतात. किंवा संपूर्ण कविता ही प्रतिकात्मक असू शकते. आणि अशा कवितेतील शब्दसमूहातून एखाद्या मिथकांचा आपल्याला बोध होत असतो. म्हणजेच मिथक आणि काव्य यांचा संबंध

किती घनिष्ट आहे याची कल्पना येते.

## २) मिथक आणि नाटक

आजच्या भारतीय रंगमंचावर मिथक आधारित नाटक हे बहुतेक वेळा पारंपरिक लोक कलाप्रकार आणि अभिजात भारतीय नृत्य, संगीत आणि युद्धकला यावर अवलंबून असून ते सर्व समावेशक नाटक म्हणून सादर केले जाते. उदा. कर्नाड यांची 'हायवदन' आणि 'नागमंडल' ही दोन नाटके अशा स्वरूपाची आहेत. मिथकांचा उल्लेख आणि संदर्भ नाटकात प्रखरतेने जाणवतो तो म्हणजे ''प्रेमानंद गज्वी यांच्या 'देवनगरी' मध्ये यल्लामा देवी हिची गोष्ट नृत्य - नाट्याद्वारे उपोद्घातात आली आहे. 'किरवंत' नाटकात गरूड पुराणातील कावळ्याची गोष्ट, संजय पवार यांच्या 'कोण म्हणतो टक्का दिला?' ह्या नाटकातील कच देवयानी आणि शुक्राचार्य यांच्या मिथकांवर आधारित उपोद्घात आहे.''[३०] असे राजीव नाईक यांनी मांडले आहे.

राजीव नाईक मिथक आणि नाटक या विषयी म्हणतात. ''मिथक विशिष्ट संस्कृतीमध्ये रूतलेली असतात. त्यामुळेच त्याचे आवाहकत्त्व सार्वत्रिक असले तरी ते मिथक आधारित नाटक प्रतिमा, पोत आणि ह्या बाबतीत अगदी भारतीय असू शकते. म्हणून मिथक आधारित नाटक घाट रूपाने संस्कृती विशिष्ट असतानाच ते सार्वत्रिक आशयापर्यंत पोचू शकते''[३१]

नाटकामध्ये मिथके येताना ती जशीच्या तशी येत नाहीत, तर ती नाटकीय स्वरूपात येतात. बऱ्याच नाटकात मिथकांचा वापर हा गुंतागुंतीची गोष्ट सांगण्यापुरताच झालेला पहावयास मिळतो.

## ३) मिथक आणि कथा / कादंबरी

स्वातंत्र्योत्तर साहित्यात विशेषत: कथा साहित्यात मिथकांचा मोठ्या प्रमाणात वापर झालेला आढळतो. मिथक ही एक गोष्ट, कथा किंवा कविता असल्याने मिथकांचे स्वरूप कथात्मक असल्याचे आढळते. नृवंशशास्त्री, मनोविश्लेषणवादी, भाषाशास्त्री

या सर्वांच्या मते, मिथकांमध्ये कथात्मकता आवश्य आढळते. अशा कथांना दंतकथा, धर्मकथा, कल्पना कथा, देवकथा, पुराणकथा, प्राक्कथा, पुराख्यान असे म्हटले जाते. या सर्वामध्ये मिथकांचे प्राबल्य असलेले जाणवते.

विश्वनाथ खैरे यांच्या मते, ''आपले जीवन, आचार-विचार, उद्योग, रंजन, सण - उत्सव, आनंद - शोकाचे विधी या सत्याबद्दल प्रत्येक समाजात संचित आणि प्रचलित कथा असतात. कथा म्हणजे कथेचे शब्दरूप त्यात कथन असतात कथा म्हणजे कथेचे शब्दरूप त्यात कथन असते, तसे वर्णनही असते. या कथांचा (म्हणजे त्यांच्या शब्द स्वरूपाचा) आशय समाजात श्रद्धेने ठरवला जातो. त्यांची मुळरूपे किंवा खरे आशय नेमके असतात काय किंवा होते हे कळत नसते. अशा कथांना मिथकथा म्हणायचे मिथ्य कथांचे प्रमाणत्त्व मिथ्य असते. मिथ्य हे सत्य नसते आणि असत्य ही नसते.''[३२]

भारतीय समाजात अनेक प्राचीन मिथ्यकथा आहेत. समाजात माणसांकरवी त्या शब्दरूपात उदयाला आल्या. बहुतेक मिथ्य कथांच्या भोवती दैवी वलय इतके घट्ट बसलेले असते की, कळत नकळत त्या वलयालाच भावनिक विचार मिथ्यकथांच्या वास्तविक विचाराहून वेगळा असलेला स्पष्ट होतो.

''मिथक कथा ही समूहमनाच्या बोधावस्थेतील स्वप्नांचे प्रतिरूपन करते. मिथक कथेचा कल्पनाबंध कायम असला तरी कालौघात त्या कथेत वारंवार परिवर्तने होत असतात. त्या त्या कालखंडातील जाणिवांनुसार, बदललेल्या मूल्य संदर्भात मिथक कथा नव्या स्वरूपात अवतरत असते..... वाङ्मयीन संहितेत व्यक्तीनिष्ठ अनुभव आणि संस्कृती संचितातील मानवी अनुभव यांच्यातील सलगता प्रस्तापित करण्यासाठी कलावंताकडून मिथकांचा कौशल्यपूर्ण वापर केला जातो.'' [३३] अशा प्रकारच्या मिथक कथा जरी काल्पनिक समजल्या जात असल्या तरी, त्यामधून मूलभूत सत्याचा आणि जीवन, मृत्यू, अस्तित्व या संदर्भातील सामूहिक प्रवृत्तींचा अविष्कार या प्रकारच्या कथांमधून होत असतो असे मानले जाते.

कथेमध्ये ज्या पद्धतीने मिथकांचा प्रभाव जाणवतो त्याच पद्धतीने तो

कादंबरीवरही पडलेला दिसून येतो. कादंबरीमध्ये जन्म - मृत्यू, नाती - गोती, इच्छा, स्वातंत्र्य, काळ, भाग्य नियती, स्त्री-पुरूष संबंध आणि स्वअस्तित्वाचा अर्थ इतक्या गोष्टी येतात. त्यामुळे कादंबरीतील मिथकांचा वापर विशिष्ट रूप धारण करतो. कथा आणि काव्याची संक्षिप्त आवृत्ती कादंबरीला मानता येईल. कादंबरी ही एकाच व्यक्तीची निर्मिती असल्याने महाकाव्याइतके मिथकांचे प्राबल्य जाणवत नाही. पण कादंबरी अधिकाधिक वस्तुनिष्ठ, वास्तवादी, समकालीन प्रत्यक्षाशी जोडलेली, आजूबाजूच्या परिसराचे प्रतिबिंब दाखवणारी असते. पौराणिक आशय घेऊन आलेल्या समकालीन कादंबऱ्यामध्ये मिथके आढळून येतात.

## मिथक आणि 'पर्व'

मानवी जीवन आणि या संबंधी गूढ सत्ये आदिम मानवाने जाणली व ती उलगडण्याच्या आणि सत्य जाणून घेण्याच्या प्रयत्नात मानवाने मिथकांची निर्मिती केली. मौखिक परंपरेवर चालत आलेल्या कथांवर संस्कार होत गेले . आणि रामायण, महाभारत या सारख्या महाकाव्यांवर मिथ्यकथांचे आवरण चढू लागले मिथ्यावर आधारलेले भारतातील पहिले साहित्य म्हणजे रामायण, महाभारत आणि पुराण हे आहे असे म्हणता येईल. ही महाकाव्ये संग्रहित होताना मिथ्यकथांची भर पडत गेली. महाभारताच्या बाबतीत तर संस्काराच्या प्रत्येक टप्प्यावर त्याचा विस्तार होत गेला आहे. व्यासांचा 'जय' नावाचा ग्रंथ शेवटी 'महाभारत' रूपाने आपल्या समोर आलेला आहे.

रामायण, महाभारत या आर्ष काव्यविषयी आजही जनसामान्यामध्ये नितांत आदर असलेला जाणवतो. त्यामधील राम, सीता, कृष्ण, अर्जुन, द्रौपदी यांचे समाजमनाने दैवतीकरण केले. महाभारताच्या बाबतीत 'यामध्ये नाही ते कुठेच नाही' अशी भावना जनमानसाची झालेली आहे. अशा या महाभारतावर आजवर विपुल प्रमाणात साहित्य निर्माण झाले आहे. अनेक लेखकांनी महाभारतातील व्यक्तिरेखा जशा भावतील तशा रेखाटल्या आहेत. मिथकांचे प्राबल्य असलेले महाभारत मात्र

कन्नड साहित्यिक एस. एल. भैरप्पा यांना मात्र वेगळेच भावलेले आहे. वास्तवतेच्या पातळीवर उतरलेले मिथक यांनी 'पर्व' या कादंबरीत रेखाटले आहे.

रूढ मिथकांचा नवा अन्वयार्थ 'पर्व' या कादंबरीमध्ये पहावयास मिळतो. या विषयी रवींद्र ठाकूर यांचे मत लक्षणीय ठरले आहे ते म्हणजे, ''महाभारत कथेवर 'पर्व' सारखी एक महान कादंबरी लिहिणारे कन्नड कादंबरीकार एस. एल. भैरप्पा यांनी तत्कालीन समाज वास्तवाच्या संदर्भात सखोल चिंतन करून कादंबरी लिहिली आहे. त्यांनी स्पष्टच म्हटले आहे की, आजही हिमालयात अशा काही जमाती आहेत की ज्यांच्यात बहुपतीकत्त्व रूढ आहे. विवाह संस्थाच नसल्याने विवाहपूर्व संतती हा प्रश्न तिथं उपस्थित होत नाही. आजही ही परिस्थिती असेल तर महाभारत ज्या काळात घडलं त्या अतिप्राचीन काळी काय परिस्थिती असेल याचे काही तर्कच आपण करू शकतो. अर्थात ते तर्क अभ्यासातून आलेले आणि वास्तवाला धरून असावेत यात शंकाच नाही.''[३४]

महाभारतातील बारकावे टिपण्यात भैरप्पा यशस्वी झालेले आहेत. सत्य शोधनाच्या दृष्टिने ही कादंबरी निर्मिली आहे, हे स्पष्टपणे जाणवते. 'पर्व' मधील व्यक्तिरेखांना दिलेले वास्तवाचे परिणाम हे या कादंबरीचे महत्त्वाचे विशेष आहे.

महाभारताचे हे विश्लेषण एक प्रायोगिक स्वरूपाचे आहे. परंपरागत चालत आलेल्या महाभारत कथेमध्ये लावण्यात आलेला अर्थ हा मिथ्यकथांच्या बाबतीत योग्य आहे. असा अट्टाहास करणे व्यर्थ ठरेल कारण मिथके ही कधीही कालमानाने बंदिस्त नसतात. सतत नवे आशय घेत त्याची व्याप्ती वाढतच राहते. 'पर्व' मध्ये मिथकांच्या आधारे समाज वास्तवावर भर दिलेला जाणवतो.

## समारोप

प्रस्तुत विवेचनावरून असे दिसून येते की, संपूर्ण समाजमनाच्या इच्छा - आकांक्षा आणि ध्येयादशीचे प्रतिबिंबब मिथक कथांमध्ये उमटलेले असते. इतकेच नव्हे तर कित्येकदा वास्तवात अशक्य असलेली आकांक्षा आणि आदर्शाची पूर्ती

मिथ्याकथांद्वारे साधली जात असते. साहित्यामध्ये मिथके ही जाणिवपूर्वक जोपासलेली दिसतात. मिथके ही समाजाचा इतिहास संक्षिप्त रूपाने आपल्या उदरात जोपासणारी संकुले आहेत.

मिथक तीव्र, उत्कट, सूचक, काव्यात्मक प्रतिकात्मक धूसर, नादमय आणि नाट्यपूर्ण असतात. त्यातून मानवी मूल्यांचा शोध अप्रत्यक्षपणे चालू असतो. मिथकातील पात्र, प्रसंग, संबंध, काही फेरफारनिशी इतर कलाकृतीमध्येही आढळतात. काहीतरी प्राथमिक, मूलभूत वैश्विक असं ते व्यक्त करतात आणि म्हणून ते पुन्हा - पुन्हा प्रकट होत राहतात. हे विशेष मिथकांमध्ये आढळतात तसेच ते नाटक, कथा, कादंबरी, कविता, शिल्प, चित्रकला या सर्वांमध्येही आढळताना दिसून येतात.

समकालीन मुद्यावर भाष्य करण्याकरिता मिथकांचा उपयोग करण्यात आला आहे. तरीही त्याला अवकाश आणि कालाच्या मर्यादा पार करू शकणारं मिथकाचे खास सामर्थ्य अनेकांना जाणवलेलं आहे. एक व्यापक सामाजिक जाणीव असली तरी भूतकाळातील अनेक घटनांचा व व्यक्तिचित्रणाचाही समाजोपयोगासाठी अर्थ लावता येतो हे यावरून स्पष्ट होते.

महाभारतामध्ये मिथकांचे प्रमाण हे इतर साहित्याच्या तुलनेत जास्त असलेले पहावयास मिळते. मराठी साहित्यामध्ये महाभारत आधारित कलाकृतीवरही या मिथकांचा परिणाम झालेला दिसून येतो. पण कन्नड कादंबरीकार एस. एल. भैरप्पा यांनी आपल्या 'पर्व' या कादंबरीमध्ये रूढ मिथकांना वेगळे करून तत्कालीन वास्तवतेच्या पातळीवर महाभारत कथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. याचा अभ्यास प्रस्तुत लघुप्रबंधात केला जाणार आहे.

प्रस्तुत प्रकरणात मिथक म्हणजे काय, मिथकाचे स्वरूप, मिथकाची संकल्पना याचा विचार केला आहे. या पुढीलप्रकरणामधून आपण 'पर्व' चा अभ्यास करणार आहोत.

**संदर्भ सूची:**

१) द्विवेदी, हजारी प्रसाद : 'मिथक और साहित्य'(नगेंन्द्र), नेशनल पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, आवृत्ती दुसरी १९८७ पृ. ७.

२) खैरे, विश्वनाथ : 'मिथ आणि मराठी साहित्य,' (संपा : शहा, मु. ब : मिथक आणि मराठी साहित्य) का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे, आवृत्ती पहिली, २००३ पृ. २.

३) रॅडम हाऊस एन्‌सायक्लोपिडीया : 'नाटकातलं मिथक'(नाईक, राजीव), पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००४ पृ. १५.

४) राजाध्यक्ष, विजया (संपा) : 'मराठी वाङ्‌मयकोश खंड चौथा,' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, आवृत्ती पहिली २००२ पृ. २६२.

५) द्विवेदी, हजारी प्रसाद : 'मिथक उद्‌भव और विकास तथा हिंदी साहित्य'(विद्यावाचस्पी, उषापुरी), नेशनल पब्लिशिंग हाऊस, नयी दिल्ली, आवृत्ती पहिली १९९६ पृ. २.

६) अर्न्स्ट , कैसिरेर : 'मिथक और साहित्य'(नगेंन्द्र), नेशनल पब्लिशिंग हाऊस, नयी दिल्ली, आवृत्ती दुसरी १९९७ पृ. ८.

७) एन्‌सायक्लोपिडीया ब्रिटॉनिका : 'नाटकातलं मिथक' (नाईक, राजीव), पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००४ पृ. १४.

८) मॅलिनोवस्की : 'नाटकातलं मिथक' (नाईक, राजीव), पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००४ पृ. १६

९) करशिआ, एलिआड : 'नाटकातलं मिथक' (नाईक, राजीव), पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००४ पृ. १६

१०) भागवत, दुर्गा (मुलाखत) : ऐस पैस गप्पा दुर्गाबाईशी' (रानडे, प्रतिभा) राजहंस प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९८ पृ. २१.

११) कुलकर्णी, गो. रा. : 'मिथ व त्याचा प्रभाव', नवभारत मे १९८० पृ. १६

१२) दाते, सुषमा : 'मिथक आणि साहित्य - परस्पर संबंध' (संपा : शहा, मु. ब : मिथक आणि मराठी साहित्य) का. स. वाणी, मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे, आवृत्ती पहिली २००३ पृ. २७.

१३) खैरे, विश्वनाथ : 'मिथ आणि मराठी साहित्य' (संपा : शहा, मुं. ब : मिथक आणि मराठी साहित्य) का. स. वाणी, मराठी प्रत अध्ययन संस्था धुळे, आवृत्ती पहिली, २००३पृ. १०.

१४) भावे, पुष्पा : पौराणिक नाटक : नवा अन्वयार्थ (प्रभुणे, अरूण), प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, १९९७ पृ. ४ (प्रस्तावना)

१५) भागवत, दुर्गा : 'लोकसाहित्याची रूपरेषा', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई, आवृत्ती पहिली १९५६ पृ. ११८.

१६) विद्यावाचस्पती, उषापुरी : 'मिथक उद्भव और विकास तथा हिंदी साहित्य', नेशनल पब्लिशिंग हाऊस, नयी दिल्ली, आवृत्ती पहिली, १९८६ पृ. ३७.

१७) लोहिया, शैला : 'भूमी आणि स्त्री - एक मिथक,' (संपा : शहा, मुं. ब : मिथक आणि मराठी साहित्य) का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन धुळे, आवृत्ती पहिली२००३ पृ. ५३.

१८) नाईक, राजीव : 'नाटकातलं मिथक', पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली, २००४ पृ. २५.

१९) राजाध्यक्ष, विजया (संपा) : 'मराठी वाङ्मय कोश खंड - चौथा' महाराष्ट्र साहित्यआणि सांस्कृतिक मंडळ मुंबई आवृत्ती पहिली , २००२ पृ. २६३.

२०) नाईक, राजीव : 'नाटकातलं मिथक', पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००४ पृ. १८.

२१) अर्न्स्ट,कैसिरेर : 'मराठी वाङ्मय कोश खंड - चौथा' (संपा : राजाध्यक्ष, विजया), महाराष्ट्र साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई, आवृत्ती पहिली, २००२ पृ. २६३.

२२) गणोरकर,प्रभा,व इतर (संपा) : 'वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश,' ग.रा. भटकळ फाऊन्डेशन मुंबई, आवृत्ती पहिली , २००१ पृ. १६१.

२३) किंबहूने रवींद्र : 'मिथक : समीक्षतेच्या संदर्भात' (संपा : शहा, मु. ब : मिथक आणि मराठी साहित्य) का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, आवृत्ती पहिली २००३ पृ. २३.

२४) राजाध्यक्ष, विजया (संपा) : 'मराठी वाङ्मय कोश खंड चौथा', महाराष्ट्र साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई, आवृत्ती पहिली २००२ पृ. २६४.

२५) नाईक, राजीव : 'नाटकातलं मिथक', पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००४ पृ. २३.

२६) गणोरकर,प्रभा,व इतर (संपा) : 'वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश,' ग.रा. भटकळ फाऊन्डेशन मुंबई, आवृत्ती पहिली २००१ पृ. १६१.

२७) तैत्रव : पृ. १६१.

२८) तैत्रव : पृ. १६२.

२९) रसाळ, सुधीर : 'केशवसुतांच्या मिथक कविता' अनुष्टुभ, मार्च - एप्रिल २००३ पृ. ६२

३०) नाईक, राजीव : 'नाटकातलं मिथक', पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००४ पृ. ४४.

३१) तैत्रव : पृ. २६.

३२) खैरे, विश्वनाथ : 'भारतीय मिथ्याचा मागोवा' समंत प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९८६ पृ. ३.

३३) गणोरकर प्रभा व इतर (संपा) : 'वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश,' ग.रा. भटकळ फाऊन्डेशन मुंबई, आवृत्ती पहिली २००१ पृ. २९९.

३४) ठाकूर, रवींद्र : 'कर्णकथेचा सामाजिक अन्वयार्थ' (संपा : शहा, मुं. ब : मिथक आणि मराठी साहित्य) का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, आवृत्ती पहिली २००३ पृ. १४३.